अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
म.राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई, (सस्नेह )
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे/प्रशिक्षण व खास पथके/रा.रा.पो.बल/ वाहतूक /विशेष कृती / लोहमार्ग / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल,पुणे/नागपूर/मो.प.वि.,पुणे /वि.सु.वि.,मुंबई / फोर्स वन, मुंबई / ना.ह.सं /म.अ.प्र.वि.,पुणे/ न.वि.अ.,नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये (अ.अ.प्र.केंद्र, नागपूर /रा.रा.पो.बल प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)
उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.
पोमसं कार्यालयातील विधी सल्लागार/विधी अधिकारी/वउपसहा.(नि.वे.)/आस्थापना-१
पोमसं कार्यालयातील सर्व स्वीय सहायक / लघुलेखक.
पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी (का.क्र. १ ते ४४)
(त्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून द्यावे.)
**प्रत माहितीस्तव - पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )**
प्रत सस्नेह सादर - अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ३२.
**(या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-ओ/४९३७/पोकनि नियमावली/४२(१२)/२०१५, दि.२९/९/२०१५ च्या अनुषंगाने)**

1743D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

Swapnil.borse@nic.in

क्रमांक :-पोमसं/२८-ओ/४९३७/मपोकनिस बैठक/एटीएम् मशिन/४३१(०५)/२०१६, मुंबई, दिनांक :- २६/१२/२०१६

विषय :- **मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समिती बैठक दि. २३/११/२०१६. पोलीस विभागाच्या जागेमध्ये विविध बँकाचे एटीएम् मशिन्स बसविण्याबाबत -**

*******

महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावलीमध्ये पोलीस विभागाच्या जागेमध्ये एटीएम मशिन बसविण्याबाबत तरतूद नाही. सदरचा मुद्दा मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीच्या दि.२३/११/२०१६च्या बैठकीत उपस्थित केला असता, त्यावेळी खालील अटींची पुर्तता होत असल्यास पोलीस विभागाच्या जागेमध्ये विविध बँकांचे एटीएम् मशिन बसविण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे :-

१. एटीएम् मशीन हे पोलीस कार्यालये ,पोलीस स्टेशन इमारत, व परिसर वगळून पोलीस मुख्यालय, पोलीस लाईन्स, राखीव पोलीस बल गटाच्या आवारात, तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्राचे आवारामध्ये रस्त्याच्या बाजूस बसविता येईल.

२. एटीएम् मशीन बसविण्यासाठी संबंधीत बँकाकडून घटक पोलीस कल्याण निधीसाठी भरीव आर्थिक मोबदला, तसेच इतरही कल्याणकारी/सुधारणाविषयक बाबींची पुर्तता होईल हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून तसे प्रस्ताव पोलीस महासंचालक यांच्या पूर्वमान्यतेसाठी वेळच्या वेळी सादर करावेत.

३. एटीएम् मशीनच्या सुरक्षेची जबाबदारी पोलीस विभागाची नसेल, ती संबंधीत बँकांची जबाबदारी असेल.

४. एटीएम् मशीन बसविण्यासाठी स्थानिक नगरपालिका/महानगरपालिका यांचे कर ; तसेच इतर संबंधीत कर भरण्याची जबाबदारी संबंधीत बँकांची, अथवा पोलीस घटक प्रमुखांची असेल.

५. एटीएम् मशीन लावण्यासाठी संबंधीत बँकाकडून भाड्यापोटी प्राप्त होणाऱ्या रकमेतुन सर्व संबंधीत कर (भरावे लागत असतील तर) वजा करुन उर्वरीत रकमेच्या २५% रक्कम धनादेश/धनाकर्षाद्वारे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये भरण्यासाठी या कार्यालयास नियमितपणे पाठवावी.

२. याबाबतची तरतूद पोलीस कल्याण निधी नियमावलीमध्ये करण्यात येत असून सर्व पोलीस घटक प्रमुखांनी वरील सूचनांचे / अटींचे काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागाच्या जागेत एटीएम् मशीन बसविण्याबाबत कार्यवाही करावी.

२६/१२/१६

**( डॉ. प्रज्ञा सरवदे )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
म.राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई, (सस्नेह )
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे/प्रशिक्षण व खास पथके/रा.रा.पो.बल/ वाहतूक /विशेष कृती / लोहमार्ग / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.

1744D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी,नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी पुणे.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल,पुणे/नागपूर/मो.प.वि.,पुणे /वि.सु.वि.,मुंबई / फोर्स वन, मुंबई / ना.ह.सं /म.अ.प्र.वि.,पुणे/ न.वि.अ.,नागपूर

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र. १ ते १६.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें (अ.अ.प्र.केंद्र, नागपूर /रा.रा.पो.बल प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)

उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.

**प्रत माहितीस्तव - पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )**

प्रत सस्नेह सादर - अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ३२.

**(या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/पोकनि नियमावली/४२(१२)/२०१५, दि.२९/९/२०१५ च्या अनुषंगाने)**

1745D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

Spare Copy

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/होंर्डीग /पुणे ग्रा./८०/२०१६.

मुंबई , दि. २८.९.२०१६

| | |
|---|---|
| संदर्भ :- | या कार्यालयाचे परिपत्रकीय ज्ञापन क्र.पोमसं /२८-अे/४९३७/मपोकनिस बैठक / ४३९(०५) / २०१६, दि. १२.०२.२०१५. |
| विषय :- | जाहिरात फलक / होर्डींग लावण्यासाठी पोलीस महासंचालक, म.राज्य .मुंबई यांच्या पूर्वपरवानगीने जाहिरात कंपन्यांना पोलीस विभागाची जागा भाडेतत्त्वावर देणे. |

*********

महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, २०१२, मध्ये नियम ९ (१)( ई) येथे जाहिरात फलक लावण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या पूर्वपरवानगीने जाहिरात कंपन्यांना पोलीस विभागाची जागा भाडे तत्त्वावर देण्याबाबत तरतूद विहीत केलेली होती. तथापि, संदर्भाधिन परिपत्रकान्वये सदरचा उपक्रम वगळण्यात आला असून त्याप्रमाणे दुरुस्ती पोलीस कल्याण निधी नियमावली-२०१५ मध्ये करण्यात आली आहे. आता याबाबत पुनर्विचार होवून सदरचा उपक्रम पुढील नमूद अटींच्या अधिन राहून राबविण्यात येण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.:-

१. जाहिरातींचे फलक/होर्डींग पोलीस घटक कार्यालयासमोर, किंवा पोलीस विभागाच्या कोणत्याही कार्यालयासमोर, तसेच पोलीस ठाण्याच्या आवारात लावू नयेत. तथापि, राखीव पोलीस गट, पोलीस प्रशिक्षण कार्यालयाच्या आवारात, पोलीस लाईनमध्ये, रस्त्यालगतच्या भागात लावण्यास हरकत नाही.

२. जाहिरातींचे फलक/होर्डींग लावतांना ते कोणत्याही वर्ज्य पदार्थांबाबत, अश्लील स्वरुपाचे, तसेच राजकीय पक्षांशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध येणारे नसावेत.

३. जाहिरात/होर्डींग मधील विषय जनक्षोभास कारणीभूत होणारे नसावेत.

४. जाहिरात /होर्डींग लावण्यापुर्वी/संबंधीत प्रकाशक/वितरकांशी करार करण्यापुर्वी त्याबाबतची सविस्तर माहिती, उदा. जाहिरात/होर्डींग लावण्याचे ठिकाण, जाहिरात /होर्डींगचा प्रकार (विषय) यापासून मिळणारे वार्षिक भाडे इ. नमूद करुन त्यासाठी पोलीस महासंचालकांची पूर्व मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव योग्य मार्फतीने या कार्यालयास वेळच्यावेळी सादर करावेत.

५. जाहिरात /होर्डींग लावण्यासाठी स्थानिक नगरपालिका /महानगरपालिका यांचे कर, तसेच इतर संबंधीत कर भरण्याबाबतची जबाबदारी संबंधीत घटकांची किंवा वितरक/ प्रकाशकाची असेल.

६. जाहिरात/होर्डींगच्या भाड्यापोटी मिळणा-या रकमेतुन सर्व संबंधीत कर वजा करुन उर्वरीत रकमेच्या २५% रक्कम धनादेश/धनाकर्षाद्वारे मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमध्ये भरण्यासाठी या कार्यालयास निश्चितपणे पाठवावी.

२. याबाबतची (सुधारीत ) तरतूद पोलीस कल्याण निधी नियमावलीमध्ये करण्यात येत असून सर्व पोलीस घटक प्रमुखांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन पोलीस विभागाच्या जागेत जाहिरात /होर्डींग लावण्याबाबत पुढील कार्यवाही करावी.

28/9/16

(डॉ. प्रज्ञा सरवदे)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
म.राज्य, मुंबई

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई, (सस्नेह )

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे/प्रशिक्षण व खास पथकें/रा.रा.पो.बल/ वाहतूक /विशेष कृती / लोहमार्ग / द.वि.प., मुंबई.

D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल,पुणे/नागपूर/मो.प.वि.,पुणे /वि.सु.वि.,मुंबई / फोर्स वन,मुंबई / ना.ह.सं /म.अ.प्र.वि.,पुणे/ न.वि.अ.,नागपूर

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये (अ.अ.प्र.केंद्र, नागपूर /रा.रा.पो.बल प्र.केंद्र, नानवीज-दौंडसह)

उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.

**प्रत माहितीस्तव - पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )**

तातडीचे / महत्वाचे

क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/पोमसं-अपोमसं-विपोमनि(प्र)बैठक/१७०/२०१६, मुंबई, दिनांक 10 /१०/२०१६.

**विषय :- घटक पोलीस कल्याण निधीमार्फत अत्यावश्यक असे उपक्रम राबविण्याबाबत:**

********

राज्यातील सर्व घटक पोलीस कल्याण निधीतील शिल्लक रक्कम व घटकांमार्फत चालविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी उपक्रमांचा आढावा घेतला असता असे दिसून आले की, सर्वच पोलीस घटकांमध्ये राबविण्यात येणारे पोलीस कल्याणकारी उपक्रम एकसमान नाहीत. ज्या घटकांकडे घटक पोलिस कल्याण निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे, निधीचे स्त्रोत जास्त आहेत अशा घटकांमध्ये कल्याणकारी उपक्रम मोठ्या प्रमाणावर राबविले जातात, व ज्या घटकांकडे घटक पोलीस कल्याण निधी कमी आहे, निधीचे स्त्रोत कमी आहेत, अशा घटकांमध्ये कल्याणकारी उपक्रम कमी प्रमाणात राबविले जातात. पोलीस कल्याणकारी योजनांमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी सर्व पोलीस घटकांमध्ये किमान काही उपक्रम एकसूत्ररितीने राबविणे आवश्यक आहे, ते उपक्रम खालीलप्रमाणे असावेत:

१. **शिक्षण व प्रशिक्षण :**

अ) उच्च शिक्षणासाठी अनुदान / अग्रिम :-

महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली मधील नियम ९(१) (ब) मधील तरतुदीनुसार , त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार पोलीस कल्याण निधीच्या सभासदांच्या पाल्यांना पुस्तक अनुदान देण्यात येते. तथापि, हुशार व होतकरु पाल्यांच्या नामांकित शिक्षण संस्थेतील उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशिप (एकरकमी अनुदान) व अग्रिम देण्यासाठी या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/१३९/२०१६,दिनांक.१९.०९.२०१६ अन्वये सुस्पष्ट /सविस्तर सूचना सर्व घटक प्रमुखांना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

आ) रोजगारभिमुख प्रशिक्षण :

प्रत्येक घटकातील पोलीसांच्या मुलांसाठी आकर्षक वेतनाच्या नोक-या व त्यासाठी शैक्षणिक / तांत्रिक पात्रता पाहून निश्चित करावेत व त्यासाठी आवश्यक शिक्षण/प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक आय्.टी.इन्स्टीट्युट, किंवा मॅनेजमेंट इन्स्टीट्युट सोबत टाय-अप करुन त्यांचेकडून अशा प्रकारच्या IT मधील कोणत्याही ट्रेड सर्टीफिकेशनसाठी पोलीसांच्या मुलांना प्रशिक्षित करुन घ्यावे, जेणेकरुन ती मुले उत्तम नोकरीसाठी पात्र ठरतील.

इ) <u>इंग्लीश स्पिकिंग</u> :-

पोलीसांची मुले इंग्लिशमध्ये बोलण्यात व लिहिण्यात प्रवीण असतील तर त्यांना नोकरी मिळणे सोपे जाते. त्यासाठी इंग्लिश स्पिकिंग कोचींगसाठी इंग्लीश स्पिंकिंग कोर्समध्ये पोलीस पाल्यांनी प्रवेश घेण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

२. <u>आरोग्य</u> :-

अ) <u>आरोग्य तपासणी</u> :-

ज्या प्रमाणे भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची दरवर्षी आरोग्य तपासणी करण्यात येते, त्याच धर्तीवर सर्व ४० वर्षावरील रा.पो.से. अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी दरवर्षी करुन घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन वेळीच उपचार होऊन भविष्यात त्यांना गंभीर आजारांना तोंड द्यावे लागणार नाही. सदरची वैद्यकीय तपासणी जिल्ह्यांमध्ये पोलीस सर्जन ेन नियुक्ती असेल तर त्यांच्याकडून करुन घ्यावी. ज्या जिल्ह्यात पोलीस सर्जन नाहीत, त्या जिल्ह्यातील स्थानिक सर्जनच्या सहाय्याने जिल्ह्यात २ ते ३ दिवसांचा 'मेडीकल कॅम्प' आयोजित करुन त्यांचेकडून स्थानिक पॅथॉलॉजी लॅब सोबत Bulk Discount Rateसाठी टाय-अप करुन सर्व पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी त्यामध्ये १) नित्याची रक्त तपासणी ( Routine Blood-tests) २) मधुमेह तपासणी ३) रक्तदाब तपासणी, व ४)यकृत कार्य तपासणी ( Liver function test) या तपासण्या करुन घ्याव्यात. ही वैद्यकीय तपासणी प्रत्येक वर्षी करुन घ्यावी, व त्याबाबतचा अहवाल त्यांच्या सेवा पुस्तकासोबत ठेवावा. हा एक महत्त्वाचा कल्याणकारी उपक्रम राहील. यासाठी पोलीस कल्याण निधीतून पैसे खर्च करता येतील.

आ) <u>व्यायाम शाळा</u> :-

प्रत्येक घटक प्रमुखाने त्यांच्या घटकामध्ये कोठे कोठे व्यायाम शाळेची आवश्यकता आहे ते निश्चित करावे. अशी ठिकाणे निश्चित करुन तेथे व्यायामशाळा बनवून त्यामध्ये व्यायामासाठी कमीत कमी आवश्यक वस्तू (साधने) ठेवण्याची व्यवस्था करावी. हा प्रकल्प पोलीसांच्या आरोग्यासाठी लाभदायी होईल.

इ) <u>लहान मुलांना खेळण्यासाठी उद्याने व साधने</u> :-

घटकांच्या मुख्यालयांमध्ये मोठया पोलीस लाईनमध्ये स्वच्छ व सुंदर असे उद्यान असावे. त्यामध्ये जॉगिंग ट्रॅक, लहान मुलांसाठी खेळ खेळण्यासाठी साधने, उदा. झोका, स्लाईड (घसरगुंडी) इत्यादी उपलब्ध करुन द्यावीत.

३. <u>जॉब कौन्सिलिंग सेंटर</u>

प्रत्येक घटकामध्ये जॉब कौन्सिलिंग सेंटर उघडावे. पोलीस कल्याण निधीशी संबंधीत पो.उपअ. (मुख्यालय) / पो.नि. कल्याण यांनी स्थानिक कंपन्यांच्या आस्थापनांशी संपर्क साधून, त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नोक-याची माहिती काढून, तेथे पोलीसांचे मुलांना नोक-या मिळण्यासाठी प्रयत्न करावेत. त्या केंद्रांमध्ये मुलांच्या नावांची, त्यांच्या शिक्षणाची व आवश्यक नोकरीबाबतची नोंदणी असावी. कंपन्यांशी टाय-अप करावा. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचारी हे सेवानिवृत्तीनंतर नोकरी करण्यास इच्छुक असल्यास त्यांनाही नोकरी मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा.

४. **<u>समाधान हेल्पलाईन</u>**

घटक कार्यालयांतील कामाची वेगाने निर्गती होण्यासाठी,अधिकारी / कर्मचा-याच्या कार्यालयीन अडिअडचणींचे त्वरेने निवारण करण्याकरिता, घटक कार्यालयांतील कामकाजामध्ये पारदर्शकता येण्यासाठी, व इतर कार्यालयीन कामांसाठी प्रत्येक घटक कार्यालयात " समाधान हेल्पलाईन " सुरु करण्याबाबत या कार्यालयाचा क्र. पोमसं / २८-अे / ४९३७ / क.चृ.प .४८-वी सभा - समाधान हेल्पलाईन / १४६ / २०१६, दिनांक. ६.९.२०१६ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामधील सूचनांनुसार प्रत्येक घटक कार्यालयाने कार्यवाही करावी.

५) <u>विरंगुळा केंद्रे :</u>

अ) पोलीस घटकातील कार्यरत सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या कर्तव्याव्यतिरिक्त निवांत वेळेत त्यांना विरंगुळा मिळण्यासाठी मुख्यालयाच्या ठिकाणी पोलीस क्लब, मनोरंजन केंद्रे, ज्यामध्ये कॅरम, टेबल टेनीस सारखे खेळ, आणि वाचनालये असावीत, यासाठीचा खर्च पोलीस कल्याण निधीतून करण्यात येईल.

आ) धार्मिक व पर्यटन स्थळाचे ठिकाणी, उदा. शिर्डी, त्र्यंबकेश्वर, महाबळेश्वर, खंडाळा, ताडोबा अशा ठिकाणी पोलीस कल्याण निधीमार्फत हॉलीडे होम्स, रेस्ट हाऊसेस असावीत, जेणेकरुन पोलीसांना सुट्टीच्या कालावधीत अशा ठिकाणी गेल्यानंतर त्यांना सवलतीच्या दरांमध्ये राहण्याची व्यवस्था उपलब्ध होईल.

ज्या ठिकाणी पोलीसांची निवासस्थाने / बराकी वापराविना पडून आहेत ती निवासस्थाने / बराकी दुरुस्त्या करून त्यांचा हॉलीडे होम, रेस्ट हाऊसाठी वापर करावा. ज्या ठिकाणी अशाप्रकारे व्यवस्था होणार नाही परंतु, रेस्ट हाऊस / हॉलीडे होम्सची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी संबंधीत घटक प्रमुखांनी जबाबदार अधिका-यास नेमून तेथील चांगली हॉटेल्स व लॉजेस मधील काही खोल्या पोलीसांसाठी माफक/किफायतशीर दराने आरक्षीत ठेवाव्यात जेणेकरुन त्यांचा वापर हॉलीडे होम म्हणून करता येईल.

इ) राज्यात १)पोलीस आयुक्त, पुणे शहर,२) पोलीस आयुक्त, ठाणे शहर, ३) पोलीस आयुक्त, नागपूर शहर, ४) पोलीस आयुक्त, अमरावती शहर, ५) पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण ६)पोलीस अधीक्षक,रायगड,७) पोलीस अधीक्षक,रत्नागिरी,८) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, ९) पोलीस अधीक्षक, धुळे, १०) पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण ११) पोलीस अधीक्षक, बीड, १२) पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, १३) पोलीस अधीक्षक, जालना, १४) पोलीस अधीक्षक, नांदेड, १५) पोलीस अधीक्षक,परभणी,१६)पोलीस अधीक्षक,लातूर,१७)पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण, १८) पोलीस अधीक्षक, अकोला १९) पोलीस अधीक्षक, सांगली, २०) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर, २१) पोलीस अधीक्षक, जळगांव, या २१ ठिकाणी पाळणाघरे चालविण्यात येत आहेत. ती पाळणाघरे व्यवस्थितपणे चालविण्यात येत आहेत काय हे पहावे जेणेकरून तेथे ठेवण्यात येत असलली लहान मुले आजारी पडू नयेत याबाबत त्रयस्थ पक्षामार्फत परिक्षण करून घ्यावे तसेच तेथे CCTV ची व्यवस्था करण्यात यावी.

२. राज्यात ( ठाणे शहर / सोलापूर शहर / औरंगाबाद शहर / नागपूर शहर / पुणे शहर / नाशिक ग्रामीण / सातारा / चंद्रपूर ) सध्या एकूण १० ठिकाणी पोलीस पब्लिक स्कुल कार्यरत आहेत. घटक प्रमुखांनी त्यांच्या शहरातील काही उत्तम दर्जाच्या शाळा व्यवस्थापनांशी संपर्क साधून पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या पाल्यांसाठी ठराविक जागा राखीव ठेवण्याचा आग्रह धरावा.

अशा शाळांची विहीत फी भरण्यासाठी, पोलीस पब्लिक स्कुलच्या फी पेक्षा अधिकची रक्कम आर्थिक सहाय्य म्हणून त्या पालकांस, संबंधीत घटक कल्याण निधीतून देण्यात येईल अशा प्रकारची योजना आखावी.

३. वरील महत्वाच्या कल्याणकारी उपक्रमांशिवाय खालील उपक्रमही घटक पोलीस प्रमुखांनी त्यांचे घटकामध्ये राबविण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही करावी.

अ) पोलीस अधिकारी / कर्मचा-यांना शासनाकडून देण्यात येत असलेल्या आर्थिक बाबी त्यांना विहीत वेळेत देण्यात येतात का ते पहावे.

उदा.

१) मासिक वेतन वेळेवर मिळते का ?

२) घरबांधणी अग्रीम शासनाचे विहीत नियमानुसार व आवश्यक त्या प्रमाणात देण्यात येते का? त्यामध्ये काही अडचणी आहेत काय किंवा कोणाची फसवणूक तर होत नाही याची वेळोवेळी तपासणी करावी.

३) स्वग्राम प्रवास भत्ता / महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत मंजूर झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना त्याबाबतची देयके वेळेत पारित होवून मिळतात काय.

४) भविष्य निर्वाह निधी केव्हा देय होतो व किती देय होतो या बाबतची माहिती सर्वांना परिपत्रकाद्वारे दयावी.

५) रजा रोखीकरण, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके गणवेश भत्ता ह्या रकमा संबंधिताना वेळेवर मिळतात का.

वरीलप्रमाणे किंवा त्यापैकी कोणत्याही एक किंवा जास्त आर्थिक बाबी संबंधितांना वेळेवर मिळत नसल्यास त्या मिळण्याबाबत परिणामकारक उपाय योजावेत.

आ) सर्व पोलीस घटक प्रमुखांनी किंवा पोलीस उपआयुक्त / अपर पोलीस अधीक्षक यांनी नवरात्रीच्या कालावधीत सोयीच्या वेळेत दरबार घेवून पोलीसांना व त्यांच्या कुटूंबियांना दसरा / दिवाळी सण, उत्साहात साजरे करण्याबाबत व त्यासाठी दिवाळी मेळावे आयोजित करण्यासाठी प्रोत्साहन देवून विविध कल्याणकारी कार्यक्रम करावेत.

इ) पोलीसांच्या मुलांसाठी वेगवेगळया स्पर्धा आयोजित कराव्यात जेणेकरुन पोलीसांचे मुलांमधील सुप्त गुणांची जाणीव होईल व त्यानुसार त्यांचा विकास करुन त्यांचे भविष्य उज्वल घडविण्यासाठी मदत होईल.

४. तरी सर्व पोलीस घटक प्रमुखानी वरील प्रमाणे उपक्रम त्यांचे घटकामध्ये सुरळीतपणे राबविले जातील याची वेळोवेळी दक्षता घ्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(सतीश माथुर)
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह )
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि, म.रा.,पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल. म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, ना.ह.सं, म.रा., मुंबई / ए.एन्.ओ., नागपूर.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध, व सायबर क्राईम मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वे/मोटार परिवहन/बिनतारी संदेशासह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रत माहितीस्तव,

पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई (सस्नेह)

क्र.पोमसं/२८-अ/४९३७/उच्चशिक्षण प्रो.यो./१३९(२०१६)/२०१७, मुंबई, दिनांक :- ९.२.२०१७

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक समक्रमांक दिनांक १९.९.२०१६.

**विषय :-** पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्चशिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शैक्षणिक कर्ज मिळण्याबाबत.

* * * * *

या कार्यालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये त्यामधील परि.(२) अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नमूद शिक्षण संस्थेमध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस एकावेळी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम अनुदान / स्कॉलरशिप म्हणून देण्यात येईल असे नमूद आहे. त्याबाबत स्पष्ट करण्यात येत आहे की, सदरची योजना या वर्षापासून (२०१६-१७) प्रथमच सुरु करण्यात आलेली असल्यामुळे २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी व त्यापुढील शैक्षणिक वर्षासाठी पोलीस कल्याण निधी सभासदांच्या ज्या पाल्याने २ (अ) मधील नमूद शिक्षण संस्थांमध्ये प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतला आहे. त्याच पाल्यास रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) अनुदान / स्कॉलरशिप देय होईल.

तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांनी उच्चशिक्षण घेत असलेल्या पाल्यांना अनुदान / स्कॉलरशिप मंजूर करताना ही बाब विचारात घ्यावी.

(अर्चना त्यागी )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा.,पुणे
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, म.रा., मुंबई
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.रा., मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ न.वि.अ.,नागपूर
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंध व सायबर क्राईम, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वे /मोटार परिवहन / बिनतारी संदेशासह)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
उप संचालक, डी.टी.एस., नाशिक
कार्यासन अधिकारी, का.क्र.३६ (अभिलेखासाठी)

845D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

20

**तातडीचे**

**क्रमांक :- पोमसं/२८-अ/४९३७/पो.कर्म.महा.दर्शन/१८४(१६)/२०१७, मुंबई, दि:-१८/२/२०१७**

**संदर्भ:-** या कार्यालयाची समक्रमांकित दिनांक १९.९.२०१६ आणि २३.९.२०१६ ची परिपत्रके

**विषय :-** पोलीस कल्याण निधीतून अनुदान देणे
महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत घेणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना (पो.शि. ते स.पो.उपनि.)

* * * * *

संदर्भाधिन परिपत्रकांच्या अनुषंगाने सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्यांना मंजूर रजा कालावधीत जे कर्मचारी **महाराष्ट्र दर्शन** रजा प्रवास सवलत घेतात त्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु.१,०००/- (एक हजार रुपये) एकरकमी अनुदान म्हणून देण्याबाबतची कार्यवाही सर्व घटक प्रमुखांनी कृपया तातडीने सुरु करावी. तसेच सदर अनुदान महाराष्ट्र दर्शन रजाप्रवास सवलत **गट वर्ष २०१७-२०२०** पासून देण्यात यावे. या प्रकरणी या कार्यालयाच्या दिनांक १९.९.२०१६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांनुसार पुढील कार्यवाही करावी.

**( अर्चना त्यागी )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक/लोहमार्ग/विशेष कृती/द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ न.वि.अ.,नागपूर
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)

790D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें (तुरुची-तासगांव सह) रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड
उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३६ (अभिलेखासाठी)

प्रत माहितीस्तव,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)

तातडीचे

क्रमांकः-पोमसं/२८-अ/४९३७/पो.कर्म.रे.हा.व हॉ.हो./१७९/२०१६,　　　　　　　　　　　　मुंबई, दिनांक २२ /०३/२०१७

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांकित परिपत्रक , दि. १९/९/२०१६.

विषय :- राज्यातील पोलीस घटकांमध्ये पोलीस कर्मचा-यांसाठी रेस्ट हाऊस, हॉलीडे होमच्या सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

*********

**परिपत्रक :**

राज्य पोलीस दलातील विविध घटकांमध्ये पोलीस अधिकारी/कर्मचा-यांसाठी रेस्ट हाऊस,हॉलीडे होम्स पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने अशा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी घटकातील वापरात नसलेले बॅरेक्स,डॉरमेटरी रुम, किंवा इतर शासकीय इमारती, ज्यांचा वापर हॉलीडे होम, रेस्ट हाऊस यासाठी करता येईल, त्यांची दुरुस्ती करुन त्या उपयोगात आणाव्यात. तसेच, तिर्थक्षेत्रे, पर्यटनस्थळांच्या ठिकाणी रेस्ट हाऊस, हॉलीडे होम बांधण्यासाठी संबंधीत घटक प्रमुखांनी जागेची उपलब्धता,पोलीस कल्याण निधीची उपलब्धता इ.विचार करुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकासह सविस्तर प्रस्ताव या कार्यालयास सादर करावेत, अशा सूचना संदर्भाधिन परिपत्रकान्वये दिल्या होत्या, त्या अनुषंगाने पो. आ., नाशिक शहर, पो.अ., बीड, नांदेड, अमरावती ग्रामीण,बुलढाणा, व समादेशक, रारापोबल, गट १४ औरंगाबाद यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

२. पोलीस अधिकारी/कर्मचा-यांसाठी रेस्ट हाऊस/हॉलीडे होम बांधून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाने तयारी दर्शविलेली असून सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात येते की, त्यांच्या घटकांमध्ये पोलीस अधिकारी/कर्मचा-यांसाठी रेस्ट हाऊस/हॉलीडे होम /इतर कल्याणकारी योजनांतर्गत इमारती बांधण्याचे काम चालू केल्यावर काही कारणास्तव बंद पडले असल्यास, त्याचे उर्वरीत बांधकाम तसेच, प्रस्तावित बांधकामे असल्यास ते महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या वरिष्ठ अधिका-यांशी संपर्क साधून लवकर पूर्ण करुन घेण्याबाबत कृपया आवश्यक ती कार्यवाही करावी, व त्याबाबत या कार्यालयास वेळोवेळी अवगत करावे. तसेच त्यांच्या घटकामध्ये निवासी /अनिवासी बांधकामाचे प्रकल्प महाराष्ट्र पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून प्रस्तावित असल्यास आणि त्यांच्या घटकामध्ये पोलीस अधिकारी/कर्मचा-यांकरिता जिल्हा पातळीवर /तालुका पातळीवर /पर्यटनस्थळी गेस्ट हाऊस /हॉलीडे होम उपलब्ध नसल्यास त्याबाबतचे प्रस्ताव गृहनिर्माण महामंडळाच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये समाविष्ट करुन ते महामंडळामार्फत पूर्ण करुन घ्यावेत.

( अर्चना त्यागी)<br>
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),<br>
पोलीस महासंचालक यांचे करिता,

प्रति

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे.<br>
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)<br>
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)<br>
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.१ ते १६<br>
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये (तुरुची-तासगांव सह) रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड<br>
प्रत सस्नेह - व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ मर्यादीत,वरळी मुंबई.

D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

Spare copy

**अतितात्काळ/महत्त्वाचे**

**क्र. पोमसं/२८-अ/४१३७/आयुष योगा/८८(१६)/२०१७,** **मुंबई, दिनांक : ६ .०४.२०१७**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे समक्रमांकित परिपत्रक, १) दिनांक ३०.०५.२०१६, व
२)दिनांक २६.१०.२०१६, आणि
३)या कार्यालयाचा बिनतारी संदेश दिनांक ५.११.२०१६ व
४)या कार्यालयाचे समक्रमांकित परिपत्रक, दिनांक ७.१२.२०१६.

**विषय :-** पोलीसांची आरोग्य सुधारणा होवून ते कर्तव्यांसाठी अधिक सक्षम व परिपूर्ण राहण्यासाठी केंद्र शासनाचा " योग प्रशिक्षण योजना " दिनांक ३१.०३.२०१७ नंतर पुढे चालू ठेवणे बाबत

** ** ** *

खालील नमूद सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते कि, या कर्यालयाच्या उपरोक्त नमूद परिपत्रकांन्वये त्यांच्या घटकामध्ये सुरु करण्यात आलेली " योग प्रशिक्षण योजना " सध्या घटकामध्ये योग प्रशिक्षण देणा-या योग प्रशिक्षकांकडूनच दिनांक ३१.०३.२०१७ नंतर पुढे संबधीत घटकांच्या घटक पोलीस कल्याण निधीमधून योग प्रशिक्षकांचे मानधन ज्याप्रमाणे देण्यात येत होते त्याच प्रमाणे (पूर्ण वेळ / अर्ध वेळ) देवून चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ज्या घटकामध्ये अत्यल्प निधी शिल्लक आहे. त्या घटकांना मध्यवर्ती पोलीस कल्याण निधीमधून योग प्रशिक्षकांचे मानधन देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर योजना पुढील आदेश होईपर्यंत चालू ठेवण्यात यावी. तरी सर्व घटक प्रमुखांनी सदर योग प्रशिक्षण योजना नियमितपणे सुरु करुन त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

तसेच या पुर्वी सर्व घटक प्रमुखांना आयुष मंत्रालयाकडून प्राप्त झालेला निधी वितरीत करण्यात आला आहे. त्या निधीचा तपशिलवार खर्च विवरणपत्र व उपयोगिता प्रमाणपत्र तात्काळ या कार्यालयास सादर करावे.

**( अर्चना त्यागी)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
सर्व पोलीस अधीक्षक, (लोहमार्ग सह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.

**प्रत,**

श्री. सुबोध तिवारी / रविकिरण दिक्षित, (सह-संचालक),
कैवल्यधाम, श्रीमन माधव योग मंदिर समिती,
स्वामी कैवल्यानंद मार्ग, लोणावळा, जि. पुणे ४१० ४०३.

855D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

तातडीचे

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/विविध उपक्रम-मासिक अहवाल/ ७९ /२०१७, मुंबई,दिनांक१५.४.२०१७

**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/२८-अे/४९३७/पोमसं-अपोमसं-विपोमनि (प्र) बैठक/१७०/२०१६, दिनांक १०.१०.२०१६.

**विषय :-** पोलीस घटक कार्यालयांमध्ये पोलीस कल्याण निधी मार्फत चालविण्यात येणा-या उपक्रमांबाबतचा मासिक अहवाल.

** ** ** *

या कार्यालयाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांची दखल घेवून खालील घटक पोलीस प्रमुखांनी त्यांच्या घटक कार्यालयांमध्ये पोलीस कल्याण निधी मार्फत चालविण्यात येणा-या विविध उपक्रमांची माहेवार माहिती या कार्यालयास ई-मेलद्वारे सादर करीत आहेत ही एक प्रशंसनीय बाब आहे :-

१) ठाणे ग्रामीण २) रायगड ३)पालघर ४) सातारा ५)अहमदनगर ६) औरंगाबाद ग्रामीण ७) जालना ८)उस्मानाबाद ९) नांदेड १०) परभणी ११) हिंगोली १२) वाशिम १३) वर्धा १४) भंडारा १५) गोंदिया, व १६) गडचिरोली.

तथापि अन्य आयुक्तालय, जिल्हे व इतर पोलीस घटक प्रमुख यांनी सदरची माहिती सादर केलेली नाही त्यावरुन ते त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीकडे लक्ष देत नाहीत असे गृहीत धरावे लागेल. **तरी इतर सर्व पोलीस घटक प्रिमुखांनी त्यांच्या घटकांची माहिती एका आठवड्यात सादर करावी तसेच अशी माहिती प्रत्येक महिन्याच्या अखेरीस निश्चितपणे सादर करण्याची तजवीज ठेवावी.**

२. या कार्यालयाच्या क्र. पोमसं/२८-अे/४९३७/उच्चशिक्षण प्रो.यो/१३९/२०१६ दिनांक १९.०९.२०१६ च्या परिपत्रकातील सूचनांन्वये पोलीस अधीकारी / कर्मचा-यांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन योजनेअंतर्गत स्कॉलरशिप / अग्रिम देण्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती वरील १६ घटकांपैकी केवळ पोलीस अधीक्षक, जालना यांनीच सादर केली आहे, हे प्रशंसनीय आहे. मात्र, सदर माहिती सर्व घटकांनी सादर करणे आवश्यक आहे.

३. सर्व घटक प्रमुखांनी पुढील वर्षासाठी (सन २०१७-१८) कल्याणकारी योजनेअंतर्गत कोणते उपक्रम चालू ठेवण्यात येणार आहेत किंवा नवे कल्याणकारी उपक्रम सुरु करण्याचे योजिले आहे, त्याबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयास सादर करावी.

४. वरील नमूद घटकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालीलप्रमाणे निष्कर्ष निघतात.:-

(१) पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच, कल्याणकारी उपक्रमांवर खर्च केल्याचे दिसून येत नाही. हॉलीडे होम संबंधात ८ हॉटेल व्यवस्थापनांसोबत टायअप केले आहे. त्याबाबतची माहिती राज्यभरातील पोलीसांना मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे, त्याची माहिती द्यावी. त्याबाबत संपर्क साधण्यासाठी संबंधीत वेल्फेअर अधिका-यांचे नांव, संपर्क दूरध्वनी क्रमांक, तसेच हॉटेलचे सर्वसाधारण दर, व सवलतीचे दर, अशा ठिकाणी प्रेक्षणीय स्थळे कोणती आहेत, इत्यादि माहिती सर्व घटकांना कळवावी.

(२) पोलीस अधीक्षक, रायगड यांनी पोलीस क्लब तोट्यात चालविण्यात येत असल्याने त्याबाबत उपाययोजना तयार करावी. सबसिडिअरी कॅन्टीनचा नफा रु .७,६५०/- इतका दर्शविला आहे, त्याची निश्चिती योग्यप्रकारे केली आहे, याची खात्री करावी. या कार्यालयाच्या क्र. पोमसं/२८-अे/४९३७/उच्चशिक्षण प्रो.यो./१३९/२०१६, दिनांक १९.९.२०१६ च्या

परिपत्रकान्वये दिलेल्या सूचनांनुसार पोलीस अधिकारी / कर्मचा-यांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन योजने-अंतर्गत स्कॉलरशिप / अग्रिम देण्याबाबतची कार्यवाही केली आहे किंवा नाही, ते नमूद केले नाही. तसेच, त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये रुपये १ कोटी पेक्षा जास्त शिल्लक असूनसुध्दा पुस्तक अनुदान व व्याख्याने, या व्यतिरिक्त इतर कल्याणकारी योजनांवर खर्च केल्याचे दिसून येत नाही.

(३) पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये रुपये ४६,४९,१७३/- इतकी रक्कम शिल्लक असतांना फक्त वैद्यकीय अनुदानासाठी (अग्रिम असावे) रु. ५०,०००/- खर्च केल्याचे दिसते. तरी कल्याणकारी उपक्रमांवरील खर्चाबाबत योजना तयार करावी, व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(४) पोलीस अधीक्षक, सातारा यांच्या आस्थापनेवरील पोलीस क्लब नफ्यात असल्याचे दिसून येते. तरी त्या क्लबची गुणवत्ता / क्षमतेमध्ये वाढ करावयाची आवश्यक्ता आहे किंवा कसे, ते कळवावे. मंगलकार्यालया पासून मिळालेले उत्पन्न रु १२०/- आहे. परंतु खर्च रु. ७,९२९/- दर्शविले आहे. तरी असे उपक्रम चालू ठेवणे उपयुक्त आहे किंवा कसे, याबाबतचे अभिप्राय कळवावेत. कल्याणकारी उपक्रमांवर , विशेष करुन पोलीस पाल्यांच्या उच्च शिक्षणावर खर्च केल्याचे दिसून येत नाही, त्याबाबत कृपया खुलासा करावा.

(५) पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांनी त्यांच्या घटकामध्ये कल्याणकारी उपक्रम चांगल्याप्रकारे राबविले आहेत, ही प्रशंसनीय बाब आहे. त्यामध्ये पोलीस क्लबच्या वापरासाठी मागणी जास्त असल्याचे दिसते. तरी सदर उपक्रमामध्ये काही सुधारणा करणे / खोल्या वाढविण्याची गरज असल्यास पो.क.नि. च्या वित्तीय प्राधिकारां नुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

(६) पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी कल्याणकारी उपक्रमांपासून मिळणा-या उत्पन्नामध्ये फक्त बहुउद्देशीय सभागृहाचा उल्लेख विवरणपत्रात केला आहे. त्याच्याव्यतिरीक्त इतर उपक्रम त्यांच्याकडे नाहीत काय, या बाबतची माहिती त्यांनी या कार्यालयास कळवावी. पोलीसांच्या पाल्यांना उच्च शिक्षण प्रोत्साहन योजनेअंतर्गत स्कॉलरशिप / अग्रिम देण्याची योजना अद्याप सुरु केलेली नाही, त्याबाबतची कारणे कळवावीत.

(७) पोलीस अधीक्षक, जालना यांच्या घटकातील पोलीस क्लब हा उपक्रम तोट्यामध्ये चालत असल्याचे दिसते. तरी तो फायद्यात चालविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, याबाबतची सविस्तर टिप्पणी त्यांनी सादर करावी.

(८) पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्या घटकातील सबसिडिअरी पोलीस कॅन्टीन तोट्यात चालू आहे, हे असे एकमेव उदाहरण दिसते. त्याचप्रमाणे पोलीस क्लबसुध्दा तोट्यात चालत आहे. तरी त्याबाबतची परिपत्रके / शासन निर्णय तपासून, त्याबाबतची कारणे शोधून त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी सविस्तर टिप्पणी सादर करावी, जेणेकरुन ते उपक्रम फायद्यात चालतील. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांचा घटक पोलीस कल्याण निधी १ कोटी रुपयांपेक्षा जास्त असूनही वैद्यकीय अनुदानासाठी (अग्रिम असावे) रु १ लाख व वैद्यकीय तपासणी शिबीर रु. ५,०००/- याव्यतिरीक्त इतर कल्याणकारी उपक्रमांवर खर्च केल्याचे दिसून येत नाही. तरी पोलीस अधीक्षकांनी त्यावर लक्ष केंद्रीत करावे.

(९) पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या घटकातील पोलीस क्लब हा उपक्रम फायद्यामध्ये चालत असल्याचे दिसते. त्या पोलीस क्लबची गुणवत्ता वाढविणे गरजेचे आहे किंवा कसे, ते कळवावे. त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये रु. २८ लाख शिल्लक असतांना कल्याणकारी उपक्रमांवर कोणताही खर्च केलेला नाही, ही बाब योग्य नाही.

(१०) पोलीस अधीक्षक, परभणी यांनी या कार्यालयाचे परिपत्रक क्र. पोमसं/ २८-अ/४९३७/क वृप / ८ वी सभा-समाधान हेल्प लाईन/१४६/२०१६, दिनांक ६.९.२०१६ अन्वये दिलेल्या सूचना निर्देशांनुसार अद्याप ही " समाधान हेल्पलाईन " हा उपक्रम सुरु केलेला नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. त्याचप्रमाणे, कोणत्याही कल्याणकारी उपक्रमावर खर्च केल्याचे दिसून येत नाही, सन २०१५-२०१६ ची कल्याण निधीचे लेखातपासणी केली नाही, जिल्हयातील कोणत्याही कर्मचा-याला पोलीस कल्याणकारी योजनांचा लाभ मिळाल्याचे दिसून येत नाही. तरी पोलीस अधीक्षकांनी याबाबत वस्तुस्थिती कळवावी. कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी सविस्तर टिप्पणी या कार्यालयास सादर करावी.

(११) पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीची शिल्लक कळविलेली नाही. तसेच, विविध उपक्रमातून झालेला नफा / तोटा विवरणपत्रामध्ये नमूद केलेला नाही. पोलीस पाल्यांच्या उच्च शिक्षण प्रोत्साहन योजनेअंतर्गत स्कॉलरशिप / अग्रिम यावर खर्च केला आहे किंवा कसे, ते स्पष्टपणे दिसून येत नाही. कल्याणकारी उपक्रमाची / उत्पन्नाची साधने वाढविण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी कोणते प्रयत्न केले आहेत, त्याबाबतची सविस्तर माहिती या कार्यालयास कळवावी.

(१२) पोलीस अधीक्षक, वाशिम यांनी पोलीस कल्याणकारी योजनांपासून मिळणारे उत्पन्न वाढविण्यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच, कल्याणकारी योजनांवर खर्च केल्याचे दिसून येत नाही.

(१३) पोलीस अधीक्षक, वर्धा यांच्या आस्थापनेवरील मंगल कार्यालयाचे या महिन्यातील उत्पन्न दाखविलेले नाही तथापि इतर वेळी उत्पन्न मिळते का ते कळवावे. तसेच मंगल कार्यालयाचा सभासदांकडून वापर किती होतो व त्यापासून वार्षिक नफा किती होतो त्याबाबतची माहिती कळवावी. त्यांच्या घटक पोलीस कल्याण निधीमध्ये रु. ३० लाख शिल्लक असतांना कल्याणकारी उपाययोजनांवर खर्च केलेला नाही, त्याची कारणे कळवावीत.

(१४) पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी पोलीस कर्मचारी सहकारी पतंस्थेच्या नफ्याची २०% रक्कम पोलीस कल्याण निधीमध्ये जमा केल्याची बाब प्रशंसनीय आहे. तथापि, कल्याणकारी उपक्रमांवर झालेल्या खर्चाची माहिती दिलेली नाही. ती माहिती विवरणपत्रामध्ये परिपूर्ण भरुन पाठवावी. तसेच अन्यघटक प्रमुखांनी ही सहकारी पतसंस्थेच्या नफ्याची २०% रक्कम घटक पोलीस कल्याण निधीमध्ये जमा करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

(१५) पोलीस अधीक्षक, गोंदिया यांनी त्यांची माहिती ई-मेल वर सादर केल्याचे दिसून येत नाही. , तरी परिपूर्ण माहिती तक्त्यामध्ये भरुन ती प्रत्येक महिन्यास सादर करावी.

(१६) पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेकडून कल्याणकारी उपक्रम चांगल्याप्रकारे चालविण्यात येत असून त्यातून फायदा देखील होत असल्याचे दिसते, ही प्रशंसनीय बाब आहे. तथापि, पोलीस पाल्यांना उच्च शिक्षण योजनेअंतर्गत, आणि पुस्तक अनुदान योजनेअंतर्गत किती खर्च केल्याचे नमूद केलेले नाही, त्याबाबतची माहिती द्यावी.

१५।५।१७

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह ) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि, म.रा.,पुणे.

864D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वे/मोटार परिवहन/बिनतारी संदेशासह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें.
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रत,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.

प्रत माहितीस्तव सादर,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

क्र. पोमसं/२८-अे/४९३७/सां.का.-तिकिट दर/५६/२०१७, मुंबई, दिनांक :१७.०४.२०१७

संदर्भ :- शासन निर्णय, गृ. वि., क्र.पीडब्ल्युएफ्-०४०१/३१९/प्र.क्र.३/ पोल-७ दि.१५/०९/२००५.

विषय :- पोलीस कल्याण उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांच्या तिकिट दरांमध्ये वाढ करण्याबाबत.

** ** ** **

**परिपत्रक :**

मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २३ (ड) आणि महाराष्ट्र पोलीस कल्याण निधी नियमावली, २०१५ मधील नियम ११ मधील तरतुदींच्या अधिन राहून नियमावली मधील नियम ८ (२) (एन्) (दोन) मध्ये निश्चित केलेले,

"खेळाच्या प्रवेशाचे दर, प्रत्येक तिकीटास रुपये ५००/- याहून अधिक असणार नाहीत. या ऐवजी रुपये १,०००/- याहून अधिक असणार नाहीत आणि विशेष सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हे दर प्रत्येक तिकीटामागे रुपये १,०००/- पर्यंत वाढविता येतील. या ऐवजी रुपये १,५००/- पर्यंत वाढविता येतील असे वाचावे."

२. सदर सुधारित दर हे ३.४.२०१७ पासून अमलात राहतील. त्याप्रमाणे पोलीस कल्याण निधी नियमावली मध्ये दुरुस्ती करण्यात येईल.

( अर्चना त्यागी )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक/लोहमार्ग/विशेष कृति/द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल., पुणे/ नागपूर/ मो.प.वि., पुणे/ वि.सु.वि., मुंबई/ फोर्स वन, मुंबई/ म.अ.प्र.वि.,पुणे/ नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई/ (न.वि.अ).,नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / बिनतारी संदेश व मोटार परिवहन सह)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें (तुरची-तासगांवसह) अ.अ.प्र.केंद्र, नागपूर / रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड )

उप संचालक, डी.टी.एस., नाशिक.

872D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

प्रत सस्नेह सादर- अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ३२.
(या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२८-अे/४९३७/पो.क.नि.नियमावली/४२(१२)/२०१५, दिनांक २९.९.२०१५ च्या अनुषंगाने)

प्रत माहितीकरिता- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई. (सस्नेह)

९११५५

<u>तातडीचे</u>

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/ iCALLहेल्पलाईन-/१८/२०१७ मुंबई, दिनांक : २७.०४.२०१७.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक दि.१२/४/२०१७ चे परिपत्रक.

विषय :- टाटा सामाजिक विज्ञान संस्थानकडून iCALL हेल्पलाईनद्वारे महाराष्ट्र पोलीसांसाठी मानसिक स्वास्थ्याबाबत विशेषतज्ञांकडून सल्ला / माहिती <u>देण्यासंबंधात जिल्हास्तरावर कार्यशाळा आयोजित करण्याबाबत -</u>
तनुजा बाबरे, पोग्रॅम असोसिएट, टाटा सामाजिक विज्ञान संस्थान.

************

या कार्यालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये निश्चित केलेल्या जिल्हा स्तरावरील कार्यशाळेच्या कार्यक्रमामध्ये बदल करण्यात येत असून सदर कार्यशाळा परिक्षेत्रीय स्तरावर परिक्षेत्रासाठी परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस आयुक्त, पुणे यांनी खालील दिलेल्या तारखांना परिक्षेत्राच्या हद्दीतील पोलीस आयुक्तालयातील, रारापोबल गटातील तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्र व इतर विशेष शाखा/घटकातील (गुअवि/रागुवि/नाहसं इत्यादी.) **पोलीस शिपाई ते पो.उप-अधीक्षक दर्जाच्या** अधिकारी/कर्मचा-यांसाठी आयोजित करावी :-

| अ.क्र. | दिनांक | कार्यशाळेचे ठिकाण | सहभागी होणारी घटक कार्यालये |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | २७/०४/२०१७ | रायगड -अलिबाग | ठाणे ग्रामीण /पालघर/ रायगड/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग व कोकण परिक्षेत्रातील इतर विशेष शाखा. |
| २ | १७/०५/२०१७ | कोल्हापूर | सोलापूर शहर /कोल्हापूर/सांगली/ सातारा /सोलापूर ग्रामीण/ कोल्हापूर परिक्षेत्र हद्दीतील (पुणे जिल्हा वगळून ) रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ३ | १/०६/२०१७ | पुणे (सदर कार्यशाळा पो.आ.पुणे शहर यांनी आयोजित करावी.) | पुणे शहर/पुणे ग्रामीण /लोहमार्ग पुणे व पुणे जिल्हयातील रारापोबल पोप्रकेंद्रे व इतर विशेष शाखा |
| ४ | १४/६/२०१७ | नाशिक | नाशिक शहर/नाशिक ग्रामीण/धुळे/ नंदुरबार/ जळगांव/अहमदनगर/ मपोअ नाशिक व नाशिक परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ५ | २७/०६/२०१७ | औरंगाबाद | औरंगाबाद शहर/औरंगाबाद ग्रामीण/उस्मानाबाद /बीड/ जालना औरंगाबाद परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ६ | ६/०७/२०१७ | नांदेड | नांदेड/ हिंगोली/परभणी/लातूर व नांदेड परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ७ | २०/०७/२०१७ | नागपूर | नागपूर शहर/नागपूर ग्रामीण/वर्धा/भंडारा /चंद्रपूर /रेल्वे नागपूर व नागपूर परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ८ | १७/०८/२०१७ | अमरावती | अमरावती शहर/अमरावती ग्रामीण/अकोला/बुलढाणा/वाशिम/ यवतमाळ व अमरावती परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |
| ९ | २१/०९/२०१७ | नागपूर (सदर कार्यशाळा पोउमनि गडचिरोली परिक्षेत्र कॅम्प नागपूर यांनी आयोजित करावी.) | गडचिरोली जिल्हा /गोंदिया जिल्हा व गडचिरोली परिक्षेत्र हद्दीतील रारापोबल,पोप्रकेंद्र व इतर विशेष शाखा. |

D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

२५

२. तरी सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षकांनी, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी व पोलीस उपमहानिरीक्षक ,गडचिरोली परिक्षेत्र यांनी त्यांच्या हद्दीतील विविध पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई ते पोलीस उप अधीक्षक दर्जाचे मिळून साधारणत: २०० पोलीस अधिकारी / कर्मचा-यांसाठी एका दिवशी १ तासाची कार्यशाळा आयोजित करण्यासाठी, जागेची तसेच इतर आवश्यक बाबींची व्यवस्था करावी. कार्यशाळा आयोजित केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास विनाविलंब पाठवावा.

२०।५।१४

**( डॉ. प्रज्ञा सरवदे )**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

**प्रति,**

पोलीस आयुक्त, पुणे शहर.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक

पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर

**प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

अपर पोलीस महासंचालक गु.अ.वि., म.रा. पुणे./रा.रा.पो.बल,म.राज्य.गोरेगांव मुंबई/प्रशिक्षण व खास पथके,म.राज्य, मुंबई.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.

सर्व पोलीस आयुक्त, (बृहन्मुंबई व पुणे शहर वगळून)

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाहसं.,म.राज्य, मुंबई.

सर्व पोलीस अधीक्षक

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६.

सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे.

उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

प्रत सस्नेह -

श्रीमती तनुजा बाबरे,
प्रोग्रॅम असोसिएट , टाटा सामाजिक विज्ञान संस्थान.
डाकपेटी क्र.८३१३
देवनार,मुंबई - ४०००८८.

D:\User\Desktop\Desk 238 A\desk 238 a.doc

Spare copy

<u>तातडीचे</u>

क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/कॅन्टीन/८७(०६)/२०१७ मुंबई, दिनांक :- २८ .४.२०१७

**संदर्भ :-** या कार्यालयाचे समक्रमांकित, दि. १६/६/२०११ चे परिपत्रक

**विषय :-** भारतीय सैन्य दलाच्या धर्तीवर पोलीस ग्राहकांना कोणत्याही सबसिडीअरी कॅन्टींनमधून ओळखपत्र दाखवून खरेदी करण्यास परवानगी देण्याबाबत -

* * * * *

